# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) (द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**( परीक्षा व मुल्यमापन मंडळ)**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२२३१०४

जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/3236 /२०२० दि. 15 /०९/२०२०

## परीपत्रक

**विषय:–** अंतिम वर्षातील/अंतिम सत्रातील विद्यार्थ्याकरीता परीक्षा आवेदन पत्र भरण्याकरिता मुदतवाढ देण्याबाबत.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य तथा सबंधित सर्व विद्यार्थ्याना कळविण्यात येते की, माहे मार्च २०२० पासून संपुर्ण देशात कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामूळे राज्यभर संचारबंदी कायदा लागू करण्यात आलेला होता. त्यामुळे काही विद्यार्थ्याना विहीत मुदतीत परीक्षा आवेदन पत्र भरता आले नसल्याने अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र स्विकारण्याबाबत महाविद्यालय स्तरावरून वारंवार विचारणा होत आहे.

त्यामुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र २०१९–२० मधील पदवी/पदव्युत्तर वर्गाच्या अंतिम वर्षाच्या/अंतिम सत्रातील जे विद्यार्थी परीक्षा आवेदन पत्र भरण्यापासून वंचीत राहिलेले असतील अशा सर्व विद्यार्थ्याना उन्हाळी–२०२० च्या परीक्षेकरिता परीक्षा आवेदन पत्र भरण्याची शेवटची मुदतवाढ दि. १५/०९/२०२० ते दि. २०/०९/२०२० पर्यंत देण्यात येत आहे. अशा विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयामार्फत विहित मुदतीत विहीत शुल्कासह परीक्षा आवेदन पत्र भरावे. मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत आवेदन पत्र स्विकारल्या जाणार नाही यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

15/9/2020

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली